2

दि.१३/०१/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेवक बुध्दभुषण सुखदेव दाभाडे, वय 31 वर्षे, पद- सहाय्यक अभियंता, गल्हाटी मध्यप्रकल्प शाखा शहापुर, जलसंपदाविभाग, ता.अंबड जि.जालना यांनी तक्रारदार यांच्याकडुन 5000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे छावणी औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | बुध्दभुषण सुखदेव दाभाडे, वय 31 वर्षे, पद- सहाय्यक अभियंता, गल्हाटी मध्यप्रकल्प शाखा शहापुर, जलसंपदाविभाग, ता.अंबड जि.जालना. (वर्ग-2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 5000/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांची कारणा दाखवा नोटीस रद्द करण्यासाठी व नौकरीत सवलत देण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार हे आलोसे यांच्या कार्यालयात कर्मचारी असुन आलोसे यांनी तक्रारदार यांना गैरवर्तन बद्दल कारणे दाखवा नोटीस दिली होती. सदरची नोटीस रद्द करण्यासाठी तसेच नौकरीत सवलत देण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. दाभाडे यांनी 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से.दाभाडे यांनी 5000/- रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 13/01/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. दाभाडे यांनी 5000/- रुपये लाचेची रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे छावणी औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोहवा बाळु थोरात, पोना दत्तात्रय होरकटे, पो.अं. केवलसिंग घुसींगे, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064.
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

13/01/23

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.